| MHRG060002802026 | दाखल दिनांक : | १६/०३/२०२६ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक : | १८/०३/२०२६ | | |
| | निकाल दिनांक : | १३/०८/२०२६ | | |
| | कालावधी : | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | ०४ | ०८ |

| | |
|---|---|
| | **पेण येथील न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात**<br>(पीठासीन अधिकारी श्रीमती अनुजा अ. काळे)<br>**नियमित फौजदारी खटला क्र. ४४/२०२६**<br>**निशाणी क्र. ३१/ब** |
| | पेण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ४/२०२६ |
| अभियोग पक्ष | पेण पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्षातर्फे वकील | सहाय्यक सरकारी वकील श्री. डी. एस. अवसरमोल |
| आरोपी | १. **तरूण विलास चव्हाण**<br>वय: २१ वर्षे, व्यवसाय: मोलमजूरी |
| | २. **राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी**<br>वयः ३७ वर्षे, व्यवसायः मोलमजुरी<br>दोघे राहणार आय्.टी.आय्. कॉलेजच्या बाजूची झोपडपट्टी, ता. पेण, जि. रायगड. |
| आरोपींतर्फे वकील | श्रीमती एम्. वाय्. म्हात्रे |

**भाग – ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख : | १४/०१/२०२६ रोजी ००.०० ते १५/०१/२०२६ रोजी ०५.४५ वाजताच्या सुमारास |

**नियमित फौजदारी खटला क्र. ४४/२०२६**
(सरकार वि. तरुण चव्हाण वगैरे ०१)
**निशाणी क्र. ३१/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाची तारीख : | १५/०१/२०२६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख : | १६/०३/२०२६ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख : | ०७/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख : | ३१/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख : | १३/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख : | १३/०८/२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख : | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याची तारीख | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कशा खाली नोंदविण्यात आला | निर्दोष सोडण्यात आले किंवा शिक्षा देण्यात आली | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरिक्षेदरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **तरूण विलास चव्हाण** | १६/०१ /२०२६ | -- | भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ११२ सह कलम ३(५) | निर्दोष सोडण्यात आले | | -- |
| २. | **राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी** | १६/०१ /२०२६ | १५/०७/ २०२६ | | | | -- |

## भाग – क

## साक्षीदारांची यादी

**अ – अभियोग पक्ष**

| अनु.क्र | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नांव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| १ | सा.क्र. १ | गणेश प्रशांत मयेकर | २८ | फिर्यादी |

ब – बचाव पक्षातर्फे साक्षीदार असल्यास

| अनु.क्र | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

क – न्यायालयातर्फे साक्षीदार असल्यास

| अनु.क्र. | साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | नि.क्र. | साक्षीदाराचा संबंध |
|---|---|---|---|---|
| १. | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## सरकारतर्फे/ आरोपीतर्फे / न्यायालयामार्फत दिल्या गेलेल्या निशाण्यांची यादी

अ– अभियोग पक्षातर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ब– बचाव पक्षातर्फे / आरोपींतर्फे निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

क– न्यायालयामार्फत निशाणी नंबर देण्यात आलेले कागदपत्र.

| अ.क्र. | कागदपत्र | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड– भौतिक वस्तू**

| **अ.क्र.** | **क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दि. १३/०८/२०२६ रोजी घोषित)

१. आरोपी क्र. १ व २ यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(३), ११२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** :

२. फिर्यादी गणेश प्रशांत मयेकर हा व्यवसायाने शिल्पकार असून, विविध ठिकाणी राष्ट्रीय महापुरुषांचे मोठमोठे धातूचे पुतळे तयार करण्याचे काम करीत असून, त्यावरच तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. तो 'स्कल्प्ट' या फर्मच्या नावाने सदर व्यवसाय करीत आहे. सन २०२४ मध्ये पेण येथील रामेश्वर कन्स्ट्रक्शनचे मालक राजू पिचीका यांनी फिर्यादीशी संपर्क साधून, पेण नगरपरिषदेकडून राष्ट्रीय महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा तयार करण्याचे काम घेतले होते. सदर पुतळे तयार करण्याच्या कामासाठी रामेश्वर कन्स्ट्रक्शन व पेण नगरपरिषद यांनी फिर्यादीस पेण नगरपरिषद येथील इन्डोअर गेम हॉल उपलब्ध करून दिला होता. सदर ठिकाणी फिर्यादी पुतळे तयार करण्याचे काम करीत आहे. सदर इन्डोअर गेम हॉलच्या मैदानाच्या बाजूस एक खिडकी असून, ती खिडकी उघडी असते. सध्या सदर ठिकाणी फिर्यादीचे (पंचधातू) ब्रास

धातूचे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा तयार करण्याचे काम सुरू आहे. सदर कामासाठी फिर्यादीकडे चार कामगार असून, ते कामगार त्याच ठिकाणी राहतात.

३. दि. १४/०१/२०२६ रोजी फिर्यादी हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या (पंचधातू) ब्रास धातूच्या अश्वारूढ पुतळ्याचे काम सुरू असलेल्या इन्डोअर गेम हॉलमध्ये सकाळी सुमारे ११.०० वाजता आला होता. त्यावेळी त्याने तेथील कामगारांना आवश्यक त्या सूचना दिल्या व त्यानंतर दुसऱ्या कामानिमित्त सुमारे १२.०० वाजता सदर ठिकाणाहून निघून गेला. त्यानंतर दि. १५/०१/२०२६ रोजी सकाळी सुमारे ०६.०० वाजता फिर्यादीचा कामगार जुनेद अन्सारी याने फोन करून कारखान्यामध्ये चोरी झाल्याचे फिर्यादीस सांगितले. त्यानंतर फिर्यादीने चौकशी केली असता, सकाळी सुमारे ०५.४५ वाजता कामगार उठले असताना त्यांच्या उशाजवळ ठेवलेले दोन मोबाईल फोन दिसून आले नाहीत. सदर मोबाईल फोनचा कारखान्यामध्ये सर्वत्र शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे सर्व पार्टस् व साहित्य सुरक्षित आहे किंवा नाही, याची तपासणी केली असता, ब्रास (पंचधातू) धातूच्या तलवारीची मॅन, मोजडी, हाताची मूठ व त्यास लागणारे रॉ मटेरियल, तसेच कामगारांचे दोन मोबाईल फोन, असा एकूण अंदाजे रु. १,२१,९००/- किंमतीचा माल चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. सदर इन्डोअर गेम हॉलच्या नगरपरिषद मैदानाच्या बाजूस असलेल्या उघड्या खिडकीतून कोणीतरी अज्ञात इसमाने प्रवेश करून वरील साहित्य व मोबाईल फोन चोरून नेले असल्याचा फिर्यादीस संशय असून, सदर चोरी अज्ञात इसमाने केली असल्याची खात्री झाल्याने फिर्यादीने पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

४. सदर फिर्यादवरुन गुन्हा क्र. ४/२०२६ नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. राजेश पाटील यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. मुद्देमाल जप्त केला व जप्ती पंचनामा तयार केला.

साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ११२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यासाठी दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(३), ११२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यासाठी दोषारोप (निशाणी क्र. ७) निश्चित केला. त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपींनी जबाब (निशाणी क्र. ८ व ९) देवून गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपींविरुद्ध कोणताही सबळ पुरावा न आल्याने निशाणी क्र. १ खाली दि. ३१/०७/२०२६ रोजी पारीत आदेशानुसार त्याचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभिलेखावर उपलब्ध असणाऱ्या पुराव्याचा आणि अभियोगपक्षाचा युक्तीवाद लक्षात घेता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले, त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपी क्र. १ व २ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ, दि. १४/०१/२०२६ रोजी ००.०० वाजल्यापासून दि. १५/०१/२०२६ रोजी सकाळी ०५.४५ वाजताच्या सुमारास, पेण नगरपरिषद येथील इन्डोअर गेम हॉलमध्ये प्रवेश करून, फिर्यादीचे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा तयार करण्यासाठी ठेवलेले ब्रास (पंचधातू) धातूच्या तलवारीची मॅन, मोजडी, हाताची मूठ व त्यासाठी लागणारे रॉ मटेरियल, तसेच कामगारांचे दोन मोबाईल फोन, | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | असा एकूण अंदाजे रु. १,२१,९००/– किंमतीचा माल चोरी करून नेला आणि त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३०५(अ)** सह कलम **३(५)** अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | |
| २. | तसेच वर नमूद कालावधीत व ठिकाणी, आरोपी क्र. १ व २ यांनी समान उद्देशाच्या पुरःसरणार्थ उघड्या खिडकीतून आतमध्ये प्रवेश करून चोरटे गृह–अतिक्रमण केले व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३३१(३)** सह कलम **३(५)** अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नकारार्थी |
| ३. | आरोपींनी किरकोळ स्वरुपाचे संघटीत गुन्हेगारी कृत्य केले व त्याद्वारे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **११२** अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नकारार्थी |
| ४. | आदेश कोणता ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

:: **का र ण मी मां सा** ::

७. आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी गणेश प्रशांत मयेकर याला निशाणी क्र. २८ कडे तपासले.

८. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**मुद्दा क्र. १ ते ३ बाबत** :

(मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याकारणाने घटनेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रितरित्या घेण्यात येत आहेत.)

९. अभियोगपक्षाने फिर्यादी गणेश प्रशांत मयेकर याची साक्ष निशाणी क्र. २८ वर नोंदविली आहे. सरतपासादरम्यान त्याने घटनेबाबत त्याला काहीही आठवत नसल्याचे स्पष्टपणे सांगितले. त्याला फिर्याद दाखविण्यात आली असता, फिर्यादीतील मजकुराबाबतही त्याला कोणतीही माहिती नसल्याचे त्याने सांगितले. तथापि, सदर फिर्यादीवरील स्वाक्षरी ही त्याचीच असल्याचे त्याने मान्य केले आहे.

१०. फिर्यादी हा अभियोग पक्षाचा महत्त्वाचा साक्षीदार आहे. तथापि, त्याने साक्षीपुराव्यामध्ये त्याच्या तक्रारीतील कोणताही मूलभूत मजकूर सांगितलेला नाही. अभियोग पक्षाच्या कथनास फिर्यादीकडून समर्थन मिळत नसल्याने, त्यास भारतीय साक्ष अधिनियम, २०२३ च्या कलम १५७ अन्वये उत्तरसूचक प्रश्न विचारण्यात आले. मात्र, त्या वेळीही फिर्यादीने अभियोग पक्षाच्या कथनास आवश्यक असे कोणतेही ठोस समर्थन दिलेले नाही.

११. फिर्यादीने सन २०२४ मध्ये राजू पिचेका यांच्या सांगण्यावरून पेण नगरपरिषद येथे राष्ट्रीय महापुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारूढ पुतळे बनविण्याचे काम स्वीकारले होते किंवा कसे, हे आठवत नसल्याचे सांगितले आहे. सदर कामासाठी पेण नगरपरिषदेकडून इंडोअर गेम हॉल उपलब्ध करून देण्यात आला होता किंवा कसे, याबाबतही त्याने अनभिज्ञता व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे, दि. १५/०१/२०२६ रोजी सकाळी ०६.०० वाजताच्या सुमारास जुनेद अन्सारी याने त्यास फोन करून कारखान्यामध्ये चोरी झाल्याचे सांगितले होते किंवा कसे, हे देखील त्यास आठवत नसल्याचे त्याने सांगितले आहे. घटनास्थळावरून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची ब्रास धातूची तलवारीची मॅन, मोजडी, हाताची मूठ, पुतळा तयार करण्यासाठी लागणारे रॉ मटेरियल तसेच दोन कामगारांचे मोबाईल फोन अज्ञात इसमाने चोरी करून नेले होते किंवा कसे, याबाबतही त्याने कोणतेही समर्थन केलेले नाही.

१२. महत्त्वाचे म्हणजे, चोरीस गेलेला मुद्देमाल त्यास परत मिळाल्यामुळे प्रस्तुत प्रकरण पुढे चालविण्यात त्यास स्वारस्य नसल्याचे फिर्यादीने आपल्या उलटतपासणीत स्पष्टपणे मान्य व कबूल केले आहे. तसेच, आरोपींविरुद्ध प्रस्तुत प्रकरणात इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष तपासायची नाही, असेही त्याने मान्य केले आहे. तथापि, आरोपींना शिक्षा होऊ नये म्हणून तो खोटी साक्ष देत असल्याची सूचना त्याने स्पष्टपणे नाकारली आहे.

१३. फिर्यादीच्या या साक्षीपुराव्याचा एकत्रित विचार करता, त्याच्या साक्षीतून अभियोग पक्षाने मांडलेल्या घटनाक्रमास कोणतेही ठोस समर्थन प्राप्त होत नाही. विशेषतः, चोरीची घटना, चोरीस गेलेला मुद्देमाल, त्याबाबतची माहिती आरोपींना कशी प्राप्त झाली, आरोपींचा सदर गुन्ह्याशी असलेला संबंध तसेच आरोपींनी प्रत्यक्षात कोणती कृती केली, याबाबत फिर्यादीच्या साक्षीतून कोणतीही विश्वासार्ह व ठोस बाब सिद्ध होत नाही.

१४. फिर्यादीच्या साक्षीपुराव्यातून असे दिसून येते की, चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळाल्यानंतर प्रस्तुत प्रकरण पुढे चालविण्यात त्यास स्वारस्य राहिलेले नाही. त्याने तक्रारीतील मूलभूत मजकुराचेही समर्थन केलेले नाही. परिणामी, फिर्यादी आपल्या स्वतःच्या तक्रारीतील कथनास पुराव्याद्वारे पुष्टी देऊ शकलेला नाही. केवळ तक्रार दाखल झालेली आहे, या बाबीच्या आधारे तक्रारीतील मजकूर सिद्ध झालेला आहे, असे मानता येणार नाही. हे देखील लक्षात घेणे आवश्यक आहे की, फौजदारी प्रकरणात आरोपीविरुद्धचा आरोप अभियोग पक्षाने स्वतंत्र, विश्वासार्ह व ठोस पुराव्याच्या आधारे वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध करणे आवश्यक असते. आरोपीविरुद्ध केवळ संशय निर्माण होणे किंवा घटनाक्रमाबाबत शक्यता निर्माण होणे हे दोषसिद्धीसाठी पर्याप्त ठरत नाही. अभियोग पक्षाच्या पुराव्यात जर आरोपीच्या सहभागाबाबत वाजवी संशय निर्माण होत असेल आणि उपलब्ध पुराव्याच्या आधारे दोषसिद्धीबाबत खात्रीपूर्वक निष्कर्ष काढता येत नसेल, तर त्याचा लाभ आरोपीस देणे आवश्यक ठरते.

१५. सदर प्रकरणात फिर्यादी हा अभियोग पक्षाचा महत्त्वाचा साक्षीदार असूनही त्याने अभियोग पक्षाच्या कथनास समर्थन दिलेले नाही. उलट, त्याच्या साक्षीतून अभियोग पक्षाच्या प्रकरणातील महत्त्वाच्या बाबीच अनिश्चित राहिल्या आहेत. आरोपींचा गुन्ह्यातील सहभाग दर्शविणारा कोणताही ठोस, सुसंगत व विश्वासार्ह पुरावा फिर्यादीच्या साक्षीतून समोर आलेला नाही. तसेच, फिर्यादीच्या साक्षीपुराव्याच्या पार्श्वभूमीवर आरोपींनी नेमका कोणता गुन्हा व कोणत्या प्रकारे केला, हे निश्चितपणे निष्पन्न होत नाही. अशा परिस्थितीत, उपलब्ध पुराव्याच्या आधारे आरोपींविरुद्ध लावण्यात आलेले आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध झाले आहेत, असा निष्कर्ष काढणे न्यायोचित ठरणार नाही. उलट, अभियोग पक्षाच्या पुराव्यात आरोपींच्या दोषाबाबत वाजवी संशय निर्माण होत आहे. त्यामुळे त्या संशयाचा लाभ आरोपींना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे, उपलब्ध संपूर्ण पुराव्याचा एकत्रित विचार करता, अभियोग पक्ष आरोपींविरुद्ध लावण्यात आलेले आरोप वाजवी संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यात अपयशी ठरला आहे, असा निष्कर्ष मी नोंदवित आहे. परिणामी, मुद्दा क्र. १ ते ३ बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीता</u>** :

१६. वरील निष्कर्ष पाहता आरोपी हे ठेवलेल्या आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे जामीन देणे गरजेचे आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

:: **आ दे श** ::

**१.** आरोपी क्र. १ व २ यांची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०५(अ), ३३१(३), ११२ सह कलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र

असलेल्या गुन्ह्यातून  भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२**. आरोपी क्र. २ चे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहेत.

**३**. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल हा फिर्यादीस यापूर्वीच परत देण्यात आल्याने त्याचा ताबा अपील कालावधीनंतर फिर्यादीकडे कायम करण्यात यावा.

**४**. आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१(१) प्रमाणे प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रक्कमेचा जामीन द्यावा.

**५**. आरोपी क्र. १ ची इतर कोणत्याही गुन्ह्यात आवश्यकता नसल्यास त्याला त्वरीत सोडून देण्यात यावे.

**६**. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत आरोपी क्र. १  यास विनामुल्य देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घोषित)

सही/–

पेण — ( **श्रीमती अ. अ. काळे** )

दिनांक : **१३/०८/२०२६**. — न्यायदंडधिकारी, प्रथम वर्ग, पेण.